| MHND130012632023 | **इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र २६६/२०२३ शांताबाई वि ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पोमनाळा** |
| --- | --- |

**निशाणी क्र. १ खालील आदेश**
**(आदेश पारीत दि. २४ जुलै, २०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने, त्यांच्या पतीच्या मृत्युची नोंद जन्म मृत्यु रजिस्टर मध्ये घेण्याबाबत जन्म मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ चे कलम १३ (१) (३) नुसार दाखल केला आहे.

२. अर्जदार शांताबाई भ्र. मारोती आंदेवाड, यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे पती मारोती पि. गणपती आंदेवाड यांचा दि. ०७ नोव्हेंबर, २०१३ रोजी मौ.पोमनाळा, ता.भोकर, जि. नांदेड येथे आकस्मिकरित्या मृत्यु झाला आहे. त्यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार ही त्यांची कायदेशीर वारसदार आहे. मृत्युची नोंद करण्याचे महत्व कळाले नसल्यामुळे अर्जदाराच्या पतीच्या मृत्युची नोंद गैरअर्जदाराच्या कार्यालयातील नोंद वहीमध्ये विहीत मुदतीत केली नाही. अर्जदाराला त्यांच्या पतीच्या मृत्यु प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदाराने दि. ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी गैरअर्जदाराच्या कार्यालयात जावुन त्यांच्या पतीच्या मृत्यु नोंदणी प्रमाणपत्राची मागणी केली असता, संबंधीत अधिकाऱ्याने अर्जदार यांच्या पतीच्या मृत्युची नोंद त्यांच्या अभिलेखात नसल्याचे कळविले आणि तसे प्रमाणपत्र दिले. अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जाव्दारे मारोती पि. गणपती आंदेवाड यांच्या मृत्युची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयाच्या संबंधीत अभिलेखात घेण्यात यावी अशी विनंती केली.

३. गैरअर्जदार यांना निशाणी क्र.१ खाली आदेश करुन प्रस्तुतच्या प्रकरणात हजर होवुन म्हणणे दाखल करण्याचा आदेश करण्यात आला. गैरअर्जदारास नोटीस तामील असुन देखील प्रस्तुत प्रकरणात ते हजर झाले नाहीत. म्हणुन प्रस्तुतचे प्रकरण गैरअर्जदारा विरुध्द एकतर्फा चालविण्यात आले. तसेच प्रस्तुतच्या अर्ज मंजुर करण्यास कोणीचीही हरकत अथवा हितसंबंध असल्यास त्यांना म्हणणे मांडण्याची संधी मिळावी म्हणुन स्थानिक वृत्त पत्र "दैनिक मराठवाडा केसरी" दि. २७ मार्च, २०२६ रोजी निशाणी क्र.१९ नुसार सदरील अर्जा बददल जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. परंतु आज पर्यंत प्रस्तुतच्या अर्जास हरकत घेण्यासाठी आज पर्यंत न्यायालया समक्ष कोणीही हजर झाले नाही.

४. अर्जदार यांनी त्यांचे स्वतःच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१४ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार यांनी कागदोपत्री पुरावा निशाणी क्र.५ खाली कागदपत्राची यादी सह, गैरअर्जदाराने दिलेल्या अर्जदाराच्या पतीच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचे प्रमाणपत्र निशाणी क्र.१८ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदार हिने स्वतःचे आधार कार्डाची प्रत निशाणी क्र.१५ वर दाखल केली आहे. तसेच त्यांच्या शिधापत्रिकेची पडताळीत प्रत निशाणी क्र.१६ वर दाखल केली आहे. आणि अर्जदार व तिच्या मयत पतीचे संयुक्त बँक खात्याचे पासबुकची पडताळीत प्रत निशाणी क्र.१७ वर दाखल केली आहे. तदनंतर अर्जदाराने पुरावा बंदची पुरसीस निशाणी क्र. २० वर दाखल केली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जदाराचे पती मारोती पि. गणपती आंदेवाड यांच्या मृत्युची नोंद गैरअर्जदार यांच्या कार्यालयातील मृत्यु नोंद रजिस्टर

मध्ये करण्यात आलेली नाही हे गैरअर्जदाराच्या निशाणी क्र.१८ वरील प्रमाणपत्रानुसार दिसुन येते. अर्जदाराने शपथेवर सांगितले आहे त्यांच्या अज्ञानीपणामुळे त्यांच्या पतीच्या मृत्युची नोंद संबंधीत कार्यालयामध्ये घेण्याचे राहुन गेले.

६. वरील पुराव्यावरुन असे स्पष्टपणे दिसते की, मारोती पि. गणपती आंदेवाड यांचा मृत्यु दि. ०७ नोव्हेंबर, २०१३ रोजी मौजे. पोमनाळा, ता. भोकर, जि. नांदेड येथे झाला आहे. त्याची नोंद अ़द्यापर्यंत संबंधीत कार्यालयात घेण्यात आलेली नाही. अर्जदाराचा अर्ज नामंजुर करावा असा सबळ पुरावा दिसुन येत नाही. त्यामुळे ठरावीक फी आकारुन मारोती पि. गणपती आंदेवाड यांच्या मृत्युची नोंद दप्तरी घेणेबाबत जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पोमनाळा, ता. भोकर जि. नांदेड यांना आदेश देणे योग्य होईल. त्यानुसार मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पोमनाळा, ता. भोकर जि. नांदेड यांना आदेश करण्यात येते की, मारोती पि. गणपती आंदेवाड यांच्या दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१३ रोजीच्या मृत्युची नोंद त्यांच्या दप्तरी करुन घ्यावी. |
| ३ | अर्जदारास आदेश देण्यात येतो की, सदरील कार्यवाहीसाठी निश्चीत केलेले शुल्क परस्पर जन्म व मृत्यु नोंदणी अधिकारी / ग्रामसेवक, |

| | |
|---|---|
| | ग्रामपंचायत कार्यालय पोमनाळा, ता. भोकर जि. नांदेड यांच्या कार्यालयात जमा करावे. |

Digitally signed by RAVI SHIVAJIRAO IRLE
Date: 2026.07.24 16:42:43 +0530

ठिकाण –भोकर.
दि. २४ जुलै, २०२६

(रवि शिवाजीराव इरले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
भोकर, ता.भोकर जि. नांदेड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Judgment are same word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer : S.T. Narwade

Court Name : Jt. C.J.J.D. & J.M.F.C, Bhokar

Date : 24-07-2026

Judgment signed by the

Presiding Officer on : 24-07-2026

Judgment uploaded on : 24-07-2026

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app "**eCourts Services**" from Android or iOS